पुढारी पुं.पा.१

## शीझान खानला एक दिवसाची कोठडी

नालासोपारा : तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील आरोपी सीझान खान याला आज वालीव पोलिसांनी वसई सत्र न्यायालयात हजर केले. यावेळी न्यायालयाने त्याला पुन्हा एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. आज न्यायालयात झालेल्या युक्तीवादात शिझानने तुनीषाला कानाखाली मारली होती. त्यामुळे त्याचा तपास करण्यासाठी दोन-दिवसाची कोठडी मागितली होती. मात्र सत्र न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. तुनीषाची आई वनिता शर्मा हिने आज पत्रकार परिषदेत सिझानवर गंभीर आरोप केले आहेत. पोलीस आता तुनीषा ला सीझानने बुरखा घालण्यासाठीही दबाव टाकला होता का? त्याला लव जिहादचा संशय आहे का? हे सुद्धा तपासून घेतले जाणार असून त्या दृष्टीकोनातूनही पोलिसांचा तपास सुरू आहे. आज न्यायालयात झालेल्या सुनावणीत पोलिसांकडे सीझान बाबतीत कोणतेही पुरावे नसल्याचे सिझानचे वकील शैलेंद्र मिश्रा यांनी सांगितले आहे.

पुण्यनगरी पृ-पा ६.

**In Short**



## वसईत थर्मोकोल कंपनीला आग

**वसई** : वसईतील चिंचोटी येथील एका थर्मोकोल बनवणाऱ्या कंपनीला अचानक भीषण आग लागली. या आगीत वित्तहानी झाली असून, या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या सात जवानांचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. आग नेमकी कशामुळे लागली हे समजू शकले नाही. अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. मात्र, तत्पूर्वी स्थानिक नागरिकांनी आगीवर नियंत्रण मिळवले होते.

सामना पा.नं.६.

# काशिमीरा हत्याकांडातील आरोपीच्या २८ वर्षांनंतर मुसक्या आवळल्या

## कतारहून परतताच मुंबई विमानतळावर ठोकल्या बेड्या

भाईंदर, दि. ३० (सा.वा.) – काशिमीरा भागातील पेणकरपाडा परिसरात मातेसह तिच्या चार मुलांची अमानुषपणे हत्या करण्यात आली होती. १९९४ साली घडलेल्या या हत्याकांडाने भाईंदर हादरले होते. तब्बल २८ वर्षांनंतर या हत्याकांडातील प्रमुख आरोपीला मीरा–भाईंदर आणि वसई–विरार गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. कतारहून परतताच मुंबई विमानतळावर काल्या ऊर्फ राजकुमार चौहान (४३) मु. कैराडी जि. बनारस उत्तर प्रदेश याला बेड्या ठोकल्या. यातील दोन आरोपी अजूनही फरार आहेत.

पेणकरपाडा येथे १६ नोव्हेंबर १९९४ रोजी आरोपी अनिल सरोज, सुनील सरोज व काल्या ऊर्फ राजकुमार यांनी पूर्ववैमनस्यातून राजनारायण प्रजापती यांच्या घरात घुसून त्यांची पत्नी जगरानीदेवी प्रजापती (२७),



मुलगा प्रमोद (५), पिंटू (२), मुलगी पिंकी (३) आणि तीन महिन्यांच्या चिमुकल्याची निर्घृण हत्या केली होती. हत्येनंतर आरोपी फरार झाले होते. गेल्या २८ वर्षांत पोलिसांना आरोपींनी गुंगारा दिला होता. यामुळे पोलिसांवर टीकेची झोड उठली होती. तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी खास पोलीस पथके तयार केली होती. गुन्हे शाखेने वाराणसी येथे जाऊन आरोपींचा ठावठिकाणा शोधण्याचा प्रयत्न केला होता. आरोपी काल्या हा कतारला असून २९ डिसेंबर रोजी विमानाने मुंबई विमानतळावर येणार असल्याचे समजले. यानुसार पोलिसांनी विमानतळावरच त्याला अटक केली.

पुण्यनगरी पु.-पा.१.

# कोविडचा धोका टाळण्यासाठी आयुक्तांकडून रुग्णालयांची पाहणी



**। मीरा रोड :** जागतिक स्तरावर खास करून पूर्व आशियामध्ये कोरोना रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने खबरदारीची बाब म्हणून मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले यांच्या उपस्थितीत पंडित भीमसेन जोशी रुग्णालय, प्रमोद महाजन हॉल येथील कोविड केअर सेंटर व इंदिरा गांधी रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या पाहणीदरम्यान महापालिकेने सुरू केलेले ऑक्सिजन प्लांट अद्ययावत करून घेण्यास सांगितले. तसेच आयुक्तांनी पुरेसा ऑक्सिजन व औषधांचा साठा उपलब्ध करून ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. पंडित भीमसेन जोशी रुग्णालय तसेच प्रमोद महाजन कोविड केअर सेंटर येथे साफसफाई करून घेऊन त्याठिकाणी आवश्यक त्या संख्येत बेडसची व्यवस्था करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. बेडसदेखील आवश्यक त्या संख्येत सुरु करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अद्याप भारतात किंवा महाराष्ट्र राज्यात कोविड रुग्णसंख्येत कोणत्याही प्रकारची रुग्णवाढ होत नसली तरी आपत्कालीन परिस्थितीत महापालिकेने पूर्ण तयारीनिशी सज्ज राहणे आवश्यक आहे, असे आयुक्तांनी सांगितले. तसेच कोविड बूस्टर डोस तसेच १८ वर्षावरील नागरिकांसाठी लसीचे दोन्ही डोस पुन्हा मोठ्या प्रमाणात सुरु करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्यासाठी लसीकरण केंद्रही पुन्हा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शहरातील सर्व नागरिकांनी नियमित मास्कचा वापर करावा, वारंवार साबणाने हात स्वच्छ धुवावे, सामाजिक अंतराचे पालन या त्रिसूत्रीचे काटेकोरपणे पालन करावे, असे सांगितले आहे. तसेच कोरोनाची लक्षणे आढळल्यास त्वरित चाचणी करून घ्यावी व शासकीय तसेच खाजगी केंद्रांवर सुरू असलेल्या ठिकाणी बूस्टर डोस घेऊन स्वतःला पूर्ण संरक्षित करावे. तसेच मीरा-भाईंदर शहरात कोविडबाबत कोणत्याही प्रकारची अफवा पसरवून भीतीचे वातावरण निर्माण करू नये, तसेच महापालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले यांनी केले आहे. या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य) संजय शिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर लहाने तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सामना पा.नं.२.

# राज्यपाल हटवा, महाराष्ट्र वाचवा!

## विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीही विरोधक आक्रमक

नागपूर, दि. ३१ (प्रतिनिधी) - 'हकालपट्टी करा, हकालपट्टी करा राज्यपालांची हकालपट्टी करा' अशा घोषणा देत विरोधक आज शेवटच्या दिवशी पुन्हा पायऱ्यांवर आले. राज्यपाल हटावची मागणी करीत विरोधक आक्रमक झाले आहेत. विविध घोषणा देऊन विरोधकांनी विधान भवन परिसर दणाणून सोडला.



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी काळी टोपी घालतात. विरोधकांनी काळ्या टोप्या उंचावत राज्यपालांचा निषेध केला. राज्यपाल गेल्या काही दिवसांपासून बेताल वक्तव्य करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले या थोर प्रभूतींविषयी त्यांनी चुकीची वक्तव्ये केली आहेत. आणखी एका कार्यक्रमात त्यांनी मराठी माणसाचा अवमान होईल, असे वक्तव्य केलेले आहे. राज्यपाल सध्या सारवासारव करीत असून चूक झाली असेल तर क्षमा मागतो, असे म्हणतात. चूक झाली असेल तर या त्यांच्या वक्तव्याचा अर्थ काय होतो. ज्या मराठी माणसांच्या महाराष्ट्रात, मुंबईत राहायचे त्यांच्याच स्वाभिमानाला धक्का द्यायचा असे हे कृत्य आहे. मराठी माणसाच्या सहनशीलतेचा अंत पाहिला जात असल्याचे यावेळी आंदोलक आमदार म्हणाले.

बुजगावणे हे शेतमालाच्या संरक्षणाकरिता शेतात उभारले जातात. पाखरांनी शेतमाल खाऊ नये असा त्यामागचा उद्देश असतो. राज्यातदेखील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या रूपात दोन बुजगावणी आहेत. यांच्यासमोर गायरान खाल्ली जात आहे, भूखंड चोरले जात आहे, महापुरुषांचा अवमान केला जात असून हे बुजगावणेरूपी सरकार गप्प बसलयं, अशी जळजळीत टीका विरोधकांनी केली. या आंदोलनात विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आमदार रोहित पवार, वैभव नाईक, विकास ठाकरे, वर्षा गायकवाड यांच्यासह महाविकास आघाडीच्या सर्व आमदारांचा सहभाग होता.

### विधिमंडळ परिसर दणाणला

महाराष्ट्राचे बुजगावणे हाकलून द्या अशी मागणी विरोधकांनी केली. 'राज्यपाल झाले भाज्यपाल', 'महाराष्ट्राचे एकच म्हणणे, द्या हाकलून हे बुजगावणे', 'राज्यपाल हटवा, महाराष्ट्र वाचवा', 'चोर है, चोर है, राज्यपाल चोर है'ची घोषणाबाजी करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधान भवन परिसर दणाणून सोडला.

लोकसत्ता पा. नं. १२.

# मद्य परवान्यांकडे पाठ

## पालघर जिल्ह्यात ३१ डिसेंबरसाठी केवळ १६ परवाने वितरित

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नाताळ आणि नववर्षाच्या मेजवाण्यांसाठी मद्य परवाना अनिवार्य करण्यात आला असला तरी नागरिकांनी मात्र त्याच्याकडे पाठ फिरवली आहे. नाताळसाठी २० जणांनी मद्य परवाना घेतला होता, तर ३१ च्या नववर्ष स्वागतच्या मेजवान्यांसाठी केवळ १६ जणांनी मद्य परवाना घेतला आहे.

ज्या हॉटेल, आस्थापना, सोसायटी क्लब हाऊस, मैदाने व रिसॉर्ट या ठिकाणी नववर्षाच्या अनुषंगाने मेजवान्यांचे आयोजन करण्यात येत आहे. विनापरवाना मद्य मेजवान्यांचे आयोजन केल्याचे आढळून आल्यास आयोजक आणि जागामालक यांच्यावर नियमातील तरतुदीनुसार रीतसर कारवाई करण्यात येणार आहे, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने जाहीर केले आहे. त्यानुसार डिसेंबर महिन्यामध्ये नाताळ तसेच नववर्षाच्या अनुषंगाने एकदिवसीय अनुज्ञप्ती ऑफलाइन आणि ऑनलाइन पध्दतीने परवाने वितरित करण्यात येत होते, परंतु नागरिकांना असे परवाने घेण्याकडे पाठ फिरवली आहे. दुसरीकडे मद्य पिण्यासाठी जो परवाना लागतो त्याचे प्रमाणदेखील कमी आहे. २०२२ या वर्षात मद्य पिण्यासाठी ऑनलाइन पध्दतीने एक वर्षाचे ५७ परवाने वितरित करण्यात आले असून कायमस्वरूपी ३७८ मद्यसेवन परवाने वितरित करण्यात आले आहेत. नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर रात्रगस्त घालण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हातील मद्यविक्री हॉटेल आस्थापनांमध्ये परराज्यातील मद्य तसेच बनावट मद्य विक्री होणार नाही यासाठी पाच कार्यकारी निरीक्षक व पाच विशेष पथकांची नेमणूक करण्यात आल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाचे जिल्ह्याचे अधीक्षक सुधाकर कदम यांनी दिली आहे.

### अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी व्हॉटस्‌ॲप आणि टोल फ्री क्रमांक

अवैध मद्यनिर्मिती व विक्री रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने ८४२२००११३३ हा व्हॉटसॲप क्रमांक तसेच १८००२३३९९९९ हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे. नववर्षाच्या दृष्टीने पालघर जिल्हा कार्यक्षेत्रातील हातभट्टी, परराज्यातुन येणारे मद्य बनावट मद्य, कर चुकविलेले मद्य इ. अवैध धंद्यातून अनुचित प्रकार घडणार नाहीत. याकरिता सीमावर्ती भागात तात्पुरते तीन तपासणी नाके सुरू करण्यात आले असून जिल्ह्यामध्ये विशेष गस्त घालून तपासणीकरिता पाच पथके तयार करण्यात आली आहे.



### आर्थिक वर्षात ८०१ गुन्हे दाखल

१ एप्रिल २०२२ ते २९ डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये जिल्ह्यामध्ये एकूण ८०१ गुन्हे नोंदविण्यात आले असून त्यापैकी ६६५ वारस व १३६ बेवारस गुन्हे आहेत. एकूण ७८६ आरोपींना अटक करण्यात आली असून १२५ वाहने जप्त करण्यात आलेली आहे. या गुन्ह्यांमध्ये एकूण ३ कोटी ८६ लाख २९ हजार ९०७ इतक्या रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने चालू महिन्यात १ डिसेंबर ते २९ डिसेंबर या काळात एकूण ९२ गुन्हे नोंदविले आहेत. या गुन्ह्यांमध्ये १२७ आरोपींना अटक करण्यात आली असून १३ वाहने जप्त करण्यात आली आहेत. या कारवाईत एकूण १ कोटी ३६ लाख ८ हजार ४२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

---

म. टा. ५ पा. १.

# दोन हजार पोलिसांचा फौजफाटा

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नववर्ष स्वागतासाठी मिरा-भाईंदर व वसई-विरार शहरात जय्यत तयारी करण्यात आली आहे. यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी मिरा-भाईंदर व वसई-विरारमध्ये तब्बल दोन हजार पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. प्रामुख्याने हुल्लडबाजांसह सराईत गुन्हेगारांवर पोलिसांचे लक्ष्य असणार आहे.

आयुक्तालयाकडून दोन्ही शहरांत नाकाबंदी करण्यात येणार आहे. वाहन चालवताना टवाळखोरी, मद्यपान करून वाहन चालवणे व विनापरवाना वाहन चालवणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांच्या मदतीने कारवाई करण्यात येणार आहे. संशयित चालकांची ब्रेथ ॲनालाझरद्वारे तपासणी करून कारवाई करण्यात येणार आहे. यासह सराईत गुन्हेगारांवर पोलिसांचे विशेष लक्ष असणार आहे. त्यासाठी साध्या वेशातील गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार हे सार्वजनिक ठिकाणी पाळत ठेवणार आहेत.

अपर पोलिस आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली २५० पोलिस अधिकारी, १२०० पोलिस अंमलदार, २५० होमगार्ड व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ३०० जवान असा कडक बंदोबस्त तैनात असणार आहे. पहाटे पाच वाजेपर्यंत हॉटेल्स व इतर आस्थापना सुरू राहणार असल्याने त्यांना आवश्यकतेनुसार खासगी सुरक्षारक्षक ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### मदत क्रमांक

अडचणीवेळी पोलिसांची मदत हवी असल्यास ११२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस आयुक्तालयाने केले आहे.

लोकसत्ता पा. नं. १२.

# वर्षभरात एक हजार लाचखोर सापळ्यात

## पुण्यात सर्वाधिक तर मुंबईत सर्वात कमी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या लाचखोरीचे प्रमाण वाढतच आहे. २०२२ या वर्षात राज्यात एक हजार १६ जणांना लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकूण ७१९ यशस्वी सापळे लावून ही कारवाई केली. दुसरीकडे या वर्षात लाच प्रकरणात अटक झालेल्यांपैकी २९ प्रकरणात लाचखोरीचे आरोप सिद्ध झाले असून ३८ लोकसेवक दोषी आढळले आहेत.

राज्याच्या लाचलुचपच प्रतिबंधक विभागाचे राज्यात आठ विभाग आहेत. या विभागानुसार लाचखोरांवर कारवाई केली जाते. राज्यात २०२२ या वर्षात लाच स्वीकारतानांचे ७१९ गुन्हे दाखल करण्यात आले. त्यामध्ये १ हजार १६ जणांना लाच घेताना रंगेहाथ अटक केली. सर्वाधिक म्हणजे १५५ लाचखोर पुण्यात सापडले असून सर्वात कमी म्हणजे ४२ लाचखोर मुंबईत आढळले आहेत. इतर विभागात ठाणे (८३), नाशिक (१२३), नागपूर (७३), अमरावती (६३), औरंगाबाद (१२०) आणि नांदेड (६०) समावेश आहे. चालू वर्षात अपसंपदेचे १२ आणि इतर भ्रष्टाचाराचे ९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

### चालू वर्षात ३८ दोषी

लाचप्रकरणातील लोकसेवकांवर न्यायालयात खटले चालविण्यात येतात. चालू वर्षात एकूण २९ लाचप्रकरणांचा निकाल लागला. त्यात ३८ लोकसेवक दोषी आढळले आहेत. त्यात वर्ग १ च्या ३, वर्ग २ च्या २ आणि वर्ग ३ च्या २१ लोकसेवकांचा समावेश आहे. त्यांच्यावर एकूण ७० लाखांचा दंड आकारण्यात आला आहे. विशेष म्हणजे लाच घेताना रंगेहाथ पकडूनही १९८ जणांना निलंबित करण्यात आलेले नाही.

### पालघर, वसईमध्ये ३६ जण अटकेत



पालघर जिल्ह्यामध्ये २०२२ या वर्षात एकूण ३६ जणांना लाच घेताना अटक करण्यात आली. ठाणे आणि पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. त्यामध्ये महसूल (६), कृषी विभाग (४), महावितरण (३), वनविभाग (२), शिक्षण विभाग (१), पोलीस (५), आरोग्य विभाग (१), ग्रामविकास (१), महापालिका (२), जात पडताळणी विभाग (१) तसेच ११ खासगी व्यक्तींचा समावेश आहे. पालघर जिल्ह्यात चालू वर्षात एका प्रकरणाचा निकाल लागला आणि त्यात दोन लोकसेवक दोषी आढळले अशी माहिती उपअधीक्षक नवनाथ जगताप यांनी दिली.


लोकसत्ता पा. नं. १२.

# वर्षभरात पालिकेच्या रुग्णालयाची दुरवस्था


**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार:** वसई-विरार महापालिकेने करोनाकाळात बांधलेल्या रुग्णालयाची वर्षभराच्या आतच दुरवस्था झाली आहे. यामुळे या रुग्णालयाच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप केले जात आहेत. येथील सीसीटीव्ही यंत्रणा मागील नऊ महिन्यांपासून बंद आहे. तर इमारतीच्या बांधकामाचे प्लास्टर गळून पडत आहे. यामुळे रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

करोनाकाळात पालिकेने आपल्या वैद्यकीय सेवा वाढविण्याकडे भर दिला होता. त्यात पालिकेने कौलसीटी, बोळिंज आणि सोपारा येथे नव्याने



रुग्णालये उभी केली. करोनाकाळानंतर ही रुग्णालये पालिकेने नियमित करून इतर रुग्णांसाठी वापरण्यास सुरुवात केली. यातील सोपारा येथील मासळी बाजारासाठी बांधलेल्या इमारतीचे पालिकेने रुग्णालयात रूपांतर केले होते. यासाठी पालिकेने कोट्यवधी रुपयाचा खर्च केला होता. मात्र केवळ वर्षभराच्या आतच या रुग्णालयाची दुरवस्था झाली आहे. वर्षभर आधी केलेले भीतीचे प्लास्टर हाताने गळून पडत आहे. त्यातच इमारतीच्या भिंतींना



तडे गेले आहेत. तर रुग्णालयातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. त्याचबरोबर कोट्यवधी रुपये खर्च करून उभे केलेले प्राणवायूचे प्रकल्पसुद्धा बंद आहेत. वर्षभरातच या रुग्णालयाची दुरवस्था झाल्याने या रुग्णालयाच्या कामाची चौकशी करण्याची मागणी रुग्णमित्र राजेंद्र ढगे यांनी केली आहे. याबाबत माहिती देताना या रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी गौरव वाघ यांनी सांगतले की, याबाबत मुख्यालयाला सूचना देण्यात आल्या आहेत. मुख्यालयाकडून लवकरच ही कामे केली जातील. त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

पुढारी पा-नं.७.

# तुनिषाला उर्दू शिकवले, हिजाब घालायला लावले

## आई वनिता शर्मा यांचा गौप्यस्फोट

**मुंबई : वृत्तसंस्था**

शिझानने तुनिषाला जाळ्यात अडकवले होते. तो आणि त्याचे कुटुंबीय तिला ब्लॅकमेल करायचे, तसेच तुनिषाला त्यांनी उर्दूही शिकायला लावले, हिजाब वापरायला लावले, असा आरोप तुनिषा शर्माच्या आईने केला आहे.

२४ डिसेंबर रोजी अलीबाबा दास्तान ए काबूल या मालिकेच्या सेटवर अभिनेत्री तुनिषा शर्माने आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात तिचा बॉयफ्रेंड असलेल्या अभिनेता शिझान खान याला अटकही करण्यात आली होती. तो सध्या कोठडीत असून त्याने आपला तुनिषासोबत ब्रेक अप झाल्याचे म्हटले आहे. दरम्यान, तुनिषाची आई वनिता शर्मा, वडील पवन शर्मा आणि त्यांचा ड्रायव्हर यांचे जबाब पोलिसांनी नोंदवले आहेत. त्यानंतर वृत्तसंस्थेशी बोलताना वनिता शर्मा यांनी सनसनाटी आरोप केले. त्या म्हणाल्या की, शिझानने ब्रेकअप केल्यानंतर आपण दुसऱ्या कुण्या मुलीसोबत आहोत का हे स्पष्टच सांगायला हवे होते. आम्ही त्याला विचारले देखील होते, पण त्याने तसे काही नाही असे सांगितले. पण तुनिषाला शिझानने आपल्या जाळ्यात ओढले होते हे नक्की असल्याचे सांगत त्या म्हणाल्या की, त्याच्यासोबत राहून तुनिषा उर्दूही शिकली व बोलायलाही लागली होती. शिझान आणि त्याचे कुटुंबीय तुनिषाला ब्लॅकमेल करत होते, असेही त्या म्हणाल्या. ती जसजशी शिझान आणि त्याच्या कुटुंबीयांच्या जवळ गेली तसतशी आमच्यापासून तुटतच गेली. आपण तिला शिझानसोबतच्या नात्याबाबत अनेकदा विचारणा केली पण ती काहीच बोलायची नाही. ती हिजाबही वापरायला लागली होती, असेही तुनिषाची आई म्हणाली,

दरम्यान, पोलिसांनी शिझान आणि तुनिषा यांच्यातील चॅटची २५० पाने मिळवली असून त्याची छाननी सुरू आहे. दुसरीकडे शिझानच्या सिक्रेट गर्लफ्रेंडचा शोध घेण्यासाठी त्याच्या मोबाईलमधील डिलिट केलेले चॅट परत मिळवण्याचा प्रयत्न पोलिसांनी सुरू केला आहे.

लोकसत्ता पा.नं.८

# शिझान खानकडून तुनिशा शर्माला मारहाण

## तुनिशाच्या आईचा दावा; आरोपीच्या कोठडीत वाढ

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**



**वसई :** अभिनेत्री तुनिशा शर्मा आत्महत्याप्रकरणी आरोपी शिझान खान याला आणखी एका दिवसाची पोलीस कोठडी वाढवून देण्यात आली आहे. दरम्यान, शिझान हा तुनिशाला मारहाण करायचा, तसेच उर्दू भाषा आणि हिजाबची सक्ती करायचा, असे गंभीर आरोप तुनिशाच्या आईने वाळीव पोलिसांना दिलेल्या पुरवणी जबाबात केले.

तुनिशा शर्मा आत्महत्या प्रकरणाला शुक्रवारी वेगळं वळण लागले. तुनिशाची आई वनिता शर्मा हिने मीरा रोड येथील निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन शिझानवर गंभीर आरोप केले. शिझानचे इतर मुलींशी प्रेमसंबंध होते. तुनिशाला ते समजल्यानंतर त्याने तुनिशाला मारहाण केली होती, असे वनिता यांनी सांगितले. शिझान तिला हिजाबची तसेच उर्दू बोलण्याची सक्ती करत होता. त्याचे कुटुंबीय देखील तुनिशाला फसवत होते. तुनिशाला 'ओसीडीट'चा आजारा होता, हे माहिती असूनही शिझानने तिची फसवणूक केली, असा आरोप तिने केला. वाळीव पोलिसांनाही तिने पुरवणी जबाब देऊन हे आरोप केले. दरम्यान, शुक्रवारी शिझानच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यांतर त्याला वसईच्या सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला आणखी एक दिवसाची पोलीस कोठडी दिली.


लोकमत

## आढावा २०२२ : वसई-विरारमधील गुन्हेगारी चिंताजनक

# पोलिस आयुक्तालय झाले, वसईतील गुन्हे नाही घटले!

**मंगेश कराळे**

लोकमत न्यूज नेटवर्क




**नालासोपारा** : वसई, विरार, नालासोपारा, मीरा रोड आणि भाईंदर या शहरांतील वाढती गुन्हेगारी आटोक्यात यावी, कायदा आणि सुव्यवस्था टिकून राहावी यासाठी १ ऑक्टोबर २०२० रोजी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली. पोलिस आयुक्तालय झाल्यावर गुन्हेगारीवर अंकुश राहील असे वाटत होते, पण आयुक्तालय होऊनही मागील काही महिन्यांत गुन्हेगारीत मोठी वाढ झाली आहे.

पोलिस आयुक्तालय असलेल्या शहरातही वर्षभरातली गुन्ह्यांची संख्या लक्षणीय आहे. यात सर्वाधिक संख्या घरफोडी, बलात्कार आणि विनयभंग या गुन्ह्यांची आहे. तर खून, वाहन चोरी यांसारखे गुन्हेही आयुक्तालयाच्या हद्दीत वाढू लागले आहेत. एकीकडे पोलिस दल सक्षम होत असताना दुसरीकडे हे गुन्हे मात्र थांबण्याचे नाव घेत नाहीत. त्यामुळे यंत्रणा नेमकी कुठे कमी पडत आहे? याचा विचार होणे गरजेचे बनले आहे.

या पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत तीन परिमंडळे येतात. यात परिमंडळ-१ असलेल्या मीरा रोड उपायुक्तालयाच्या हद्दीत मीरा रोड, काशीमिरा, भाईंदर, उत्तन, नवघर आणि नयानगर ही पोलिस ठाणी तसेच गुन्हे शाखा १ आणि मध्यवर्ती गुन्हे शाखा हे येतात. परिमंडळ-२ असलेल्या वसई उपायुक्तालयाच्या हद्दीत वसई, माणिकपूर, तुळींज, वालीव आणि आचोळे ही पोलिस ठाणी तसेच गुन्हे शाखा-२ कार्यरत आहेत. परिमंडळ-३ असलेल्या विरार उपायुक्तालयाच्या हद्दीत विरार, पेल्हार, मांडवी, नालासोपारा आणि अर्नाळा ही पोलिस ठाणी तसेच गुन्हे शाखा ३ येतात.

२०२२ सालात पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत नोव्हेंबरपर्यंत ३२ खून झाले असून ते सर्व गुन्हे उघड आहेत. वाहन चोरीचे ७७५ गुन्हे दाखल असून ३४९ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. एखाद्याची सोनसाखळी चोरून नेणे, एखाद्याचे पैसे हिसकावणे, एखाद्याचा मोबाइल लांबवणे असे हे किरकोळ गुन्हे आहेत, मात्र किरकोळ असले, तरी ते दिवसेंदिवस वाढत आहेत. चेन जबरी चोरीचे ३५ गुन्हे दाखल असून २० गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Dec 31, 2022
Powered by: erelego.com


लोकमत

# धर्मांतरासाठी शिजानच्या कुटुंबीयांचा तुनीषावर दबाव

## पत्रकार परिषदेत आईचा आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** शिजान खान व त्याच्या



कुटुंबीयांनी तुनीषावर धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा खळबळजनक आरोप अभिनेत्री तुनीषाची आई वनिता शर्मा यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. तुनीषाने शिजानच्या फोनमध्ये दुसऱ्या मुलीचा मेसेज पाहिल्यानेच त्यांचे ब्रेकअप झाल्याचेही वनिता यांनी सांगितले.

वनिता पुढे म्हणाल्या की, शिजानची आई तुनीषाचा छळ करत असे. त्याची बहीण तुनीषाला दर्ग्यात घेऊन जायची. शिजानने तुनीषाला लग्नाचेही आश्वासन दिले होते आणि तो तिच्यावर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी दबाव टाकत होता; पण तो तिची फसवणूक करत होता. माझी मुलगी बदलली होती. शिजान भेटल्यानंतर तिने हिजाब घालण्यास सुरुवात केली. ती त्याच्याकडून उर्दू शिकू लागली होती. शिजानचे दुसऱ्या मुलीसोबत अफेअर असल्याचे तुनीषाला कळले होते. तिने त्याच्या फोनवर दुसऱ्या मुलीशी झालेला संवाद वाचला होता. त्यामुळेच त्यांच्यात भांडण झाले आणि ब्रेकअप झाले होते

### शिजानच्या कोठडीत एक दिवसाची वाढ

अभिनेत्री तुनीषा शर्माच्या आत्महत्येप्रकरणी अटकेत असलेला आरोपी प्रियकर शिजान खानची दोन दिवसांची पोलिस कोठडी संपल्यावर शुक्रवारी वालीव पोलिसांनी त्याला वसई न्यायालयात हजर केले. पोलिसांना या गुन्ह्यासंदर्भात तपास व चौकशी करण्यासाठी शिजानची एक दिवसांची पोलिस कोठडी वाढविण्यात आली आहे. याप्रकरणी तुनीषाची आई वनिता शर्मा यांचा पुरवणी जवाब झाल्याचेही कळते.

Mumbai Main
Page No. 4 Dec 31, 2022
Powered by: erelego.com

लोकमत




# थर्माकोल कंपनीला आग

लोकमत न्यूज़ नेटवर्क

**नालासोपारा** : वसईतील चिंचोटी येथील एका थर्माकोल बनविणाऱ्या कंपनीच्या युनिटला शुक्रवारी सकाळी अचानक आग लागली. या आगीमुळे धुराचे मोठे लोट परिसरात पसरले आहे. या आगीत मोठी वित्तहानी झाली असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी वसई-विरार महापालिकांच्या अग्निशमन दलाच्या सात जवानांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. ही आग नेमकी कशामुळे लागली हे समजू शकले नाही. ही कंपनी अनधिकृत असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. अधिक तपास सुरू आहे.

Hello Vasai
Page No. 1 Dec 31, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# लोनच्या आमिषाने केली फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : वालीवच्या समतानगर चाळीत राहणाऱ्या दिनेश यादव (वय ३२) यांची २० जून २०२० ते ६ डिसेंबर २०२२ यादरम्यान लोन देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली आहे. वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी संदीप खुराणाने त्यांचे फ्युचर फायनान्शिल सर्व्हिस लि. या कंपनीतून ५ लाखांचे लोन मंजूर करून देतो, असे सांगून वेगवेगळ्या बँक खात्यांवर व 'गूगल पे'द्वारे २ लाख २५ हजार ९९८ रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करून घेतले. नंतर बँकेत काम करणारी आरोपी महिला मोनिका जैनने संदीप खुराणाची बदली झाली व लोनसाठी घेतलेले पैसे परत करून देते, असे सांगून ६ लाख ७४ हजार २ रुपये घेतले. दोन्ही आरोपींनी दिनेश यांच्याकडून सुमारे ८ लाख ९० हजार रुपये घेऊन फसवणूक केली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Dec 31, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# सदनिकेच्या नावावर फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : विरारच्या ग्लोबल सिटीतील विवा राज मैत्री येथे राहणाऱ्या दीपेश करगुटकर (२९) यांची २० जून ते आजपर्यंत सदनिकेच्या नावावर फसवणूक करण्यात आली आहे.

नंदकिशोर माने आणि राजेश नाईक या दोघांनी सदनिका विकत देतो, असे सांगून १८ लाख ४५ हजार रुपये घेतले. त्यांना सदनिका वा घेतलेले पैसेही परत न करता फसवणूक केली आहे. अर्नाळा पोलिसांनी गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Dec 31, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# आंदोलनात सहभागी होताय? नोकरीसाठी ठरू शकते अडचण

## सरकारी नोकरीत गुणवत्तेबरोबरच चारित्र्याला सर्वाधिक महत्त्व

**मंगेश कराळे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : सरकारी नोकरीत गुणवत्तेबरोबरच चारित्र्याला सर्वाधिक महत्त्व आहे. चारित्र्य लहानपणापासून कसे जपले हे पाहण्यासाठी शासन चारित्र्य पडताळणीला महत्त्व देते. प्रत्येकाला सरकारी नोकरी हवी असते. त्यासाठी सगळेच जण खूप प्रयत्न करतात. मात्र अनेकदा सण, उत्सवांसह आंदोलनांमध्ये उत्साहाच्या भरात कायदे मोडले जातात. यामुळे मारामारी, आंदोलनात सहभागी होत असाल तर ते नोकरीसाठी अडचणीचे ठरू शकते, ही गोष्ट तरुणांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

महाविद्यालयात शिकत असताना एकमेकांच्या संगतीने आपल्या हातून नकळत गुन्हा घडतो. त्यामुळे संबंधितांवर गुन्हे दाखल होऊ शकतात. तसे झाल्यास ते निस्तरताना पुढे नोकरी व्यवसायासाठी किंवा परदेशात जाताना अडचणीचे ठरू शकते. याचे तारतम्य ठेवणे हिताचे ठरेल. त्यामुळे आपला मुलगा चुकीच्या संगतीमध्ये जाणार नाही, याची काळजी पालकांनी घेणे गरजेचे आहे. सरकारी नोकरी नव्हे, तर आता खासगी कंपन्यांतही चारित्र्य पडताळणीचा दाखल मागितला जातो. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक कंपनीत नोकरी करीत असल्यास अशा वेळी त्यांच्या हातून एखादा गुन्हा घडण्याची शक्यता असते. त्यामुळे कंपनीची साहजिकच बदनामी होते.



### आंदोलनात सहभागी होताना नकळत घडतो गुन्हा

शिक्षण घेत असलेले विद्यार्थी आंदोलनाच्या जोशात कायदे मोडतात. परिणामी, त्यांच्यावरसुद्धा गुन्हे दाखल होतात. या गुन्ह्यांमुळे भविष्यात या तरुणांना सरकारी नोकरी मिळणे कठीण होते. आंदोलनात सहभागी होताना एकमेकांच्या संगतीने आपल्या हातून नकळत गुन्हा घडतो. पण, जेव्हा हीच मुले महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर नोकरीसाठी अर्ज करतात, तेव्हा हेच गुन्हे त्यांना अडचणीचे ठरू शकतात.

### नोकरीवेळी व्हेरिफिकेशन अर्जावर खोटी माहिती पडते उघड

सरकारी नोकरीच्या अर्जात जर एखाद्याने गुन्हेगारी रेकॉर्डशी संबंधित माहिती लपवलेली असेल तर ती गांभीर्याने घेतली जाते. त्या व्यक्तीविरोधात खटलाही दाखल होऊ शकतो. उमेदवारी रद्द होण्याची शक्यता असते. तर तो नोकरीवर काम करत असेल तर त्याची सेवा संपुष्टात येऊ शकते.



### तरुणांनी काय काळजी घ्यावी?

- नोकरीसाठी अर्ज करताना चारित्र्य पडताळणी दाखल्यामध्ये खोटी माहिती भरतात. तात्पुरत्या पत्त्यावर त्यांना चारित्र्य पडताळणी दाखला मिळूनही जातो. प्रत्यक्षात नोकरीमध्ये निवड होते, तेव्हा पुन्हा सर्व कागदपत्रांची तपासणी केली जाते. तेव्हा जन्म झाला तेथील सर्व माहिती प्रशासनाला समजते.

### गुन्हा दाखल असेल तर शासकीय नोकरी नाही

जर एखाद्यावर गुन्हा दाखल असेल तर त्याला शासकीय नोकरी मिळत नाही. सरकारी नोकरीच्या भरती प्रक्रियेत चारित्र्य पडताळणीचा दाखला घेतला जातो. सरकारी नोकरी करू इच्छिणाऱ्या व्यक्तीचे चारित्र्य कसे आहे हे त्यातून पाहिले जाते.



शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी करियरकडे लक्ष द्यावे. त्यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यांमुळे त्यांना नोकरी मिळण्यासाठी अडचण येते. त्यामुळे मुलांनी केवळ आपल्या करियरकडे प्राधान्य देणे गरजेचे आहे. कायद्याचा भंग होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

\- पोलिस प्रशासन

Hello Vasai
Page No. 3 Dec 31, 2022
Powered by: erelego.com

समय भास्कर

# नए साल को लेकर पुलिस आयुक्तालय की तैयारी पूरी

**पंकज दुबे/मीरा-भाईंदर**

मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय ने सुरक्षा के लिहाज से नए वर्ष को लेकर अपनी सारी तैयारियां पूरी कर ली है, नए वर्ष पर पुलिस और ट्रैफिक विभाग पूरी तरह से सतर्क रहेगी, ड्रंक एंड ड्राइव के लिए ट्रैफिक विभाग ब्रेथ एनालाइजर मशीन का उपयोग करेगी ।

गौरतलब है कि नये वर्ष पर पश्चिमी देशों के साथ-साथ भारत के युवा भी काफी उत्साहित रहते हैं और इसका स्वागत बड़े ही हर्षोल्लास के साथ करते हैं, साथ ही वे देर रात तक मद्यपान भी करते हैं, मद्यपान करने के बाद कई जगहों पर शांति व्यवस्था भी खराब होती है, इस व्यवस्था को बनाए रखने के लिए पुलिस आयुक्तालय ने मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के हद में आने वाले तीनो ट्रैफिक विभाग और सभी पुलिस स्टेशनो को कडी हिदायत दी है कि नये वर्ष पर हुड़दंग मचाने वालों पर कड़ी कार्रवाई हो ।नए वर्ष के अवसर पर राज्य सरकार ने सभी रेस्तरां और बारो को सुबह 5:00 बजे तक खोलने की अनुमति दी है, साथ ही उन्हें यह हिदायत दी है कि ये सभी भी सुरक्षा का ध्यान रखें ।

समय भास्कर

# मासूम बच्चों के हत्यारे को काशीमीरा पुलिस ने 28 साल बाद किया गिरफ्तार



## मीरा रोड मे महिला और उसके चार मासूम बच्चे की हुयी थी हत्या



**पंकज दुबे/मीरा- भाईंदर**

काशीमीरा पुलिस स्टेशन के क्राइम ब्रांच यूनिट ने हत्या जैसे संगीन मामले में लिप्त आरोपी को 28 सालों के बाद गिरफ्तार कर लिया है । पुलिस विभाग इसे क्राइम ब्रांच के पुलिस निरीक्षक अविराज कुराडे और उनकी टीम की बड़ी सफलता मान रही है।

काशीमीरा पुलिस स्टेशन मे रखे प्रेस वार्ता में मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस उपायुक्त (क्राइम ब्रांच) अविनाश अंबुरे ने बताया कि यह हत्या का मामला 28 वर्ष पुराना है, जहां 1994 मे मीरा रोड के पेणकर पाडा चाल में रहने वाले दो परिवारों का आपसी झगड़ा हो गया और बात हत्या तक पहुंच गयी ।

पकड़ा गया आरोपी अपने दो साथियों के साथ धारदार हथियार के साथ अपने पड़ोसी के घर में घुसता है और महिला और उसके चार बच्चो को मौत के घाट उतार देता है, मरने वालो सभी बच्चों की उम्र 5 वर्ष के निचे थी, और एक बच्चा 3 महीने का नवजात शिशु था। इस मामले की रिपोर्ट काशीमीरा पुलिस स्टेशन में दर्ज की गयी थी।

कई वर्ष बीत जाने के बाद भी पुलिस आरोपी की तलाश में थी, जून 2021 में क्राइम ब्रांच के पुष्पेंद्र थापा को आरोपी के बारे में सूत्रों के हवाले से खबर मिली उन्होंने आरोपियों की तलाश में उत्तर प्रदेश के कई जिलों का दौरा किया, जहां उन्हें 1 आरोपी के बारे में पता चला कि वह काम के सिलसिले में देश के बाहर गया है, क्राइम ब्रांच यूनिट में वर्ष 2021 में लुक आउट नोटिस जारी कर दिया था, वापस भारत आने पर एयरपोर्ट के माइग्रेशन डिपार्टमेंट के मदद से पुलिस ने एक आरोपी को 28 सालों के बाद गिरफ्तार कर लिया ‌इस कार्य के लिए पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ने पुलिस निरीक्षक अविराज कुराडे और उनकी टीम के पुष्पेंद्र थापा सहित सभी कर्मचारियों की सराहना की।

www.hamarametro.com hamarametrobr@gmail.com
दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, महाराष्ट्र, हरियाणा राजस्थान एवं मध्य प्रदेश से एक साथ प्रकाशित

राष्ट्रीय दैनिक समाचार पत्र
हमारा मेट्रो
एक अखबार झारखंड-बिहार

शनिवार 31 दिसंबर 2022
वर्ष - 7, अंक - 289
पृष्ठ - 8
बिहार संस्करण
मूल्य - 2 रुपए
RNI No : BIHHIN - 2015/61823

3 मेयर सहित सभी पार्षदों को चैम्बर ने दी बधाई....
6 वर्ष 2022 में कृषि के लिए रिकॉर्ड बजट एवं निर्यात...
8 भूमि पेडनेकर दोस्तों के सात मेक्सिको में मनाएंगे नया साल....

# 28 साल के बाद हत्या का आरोपी चढ़ा पुलिस के हत्थे

## क्राइम ब्रांच यूनिट 1 को मिली बड़ी कामयाबी

**मुंबई हमारा मेट्रो ब्यूरों (विनय महाजन)** मीरा भाईदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले क्राइम ब्रांच यूनिट 1 को 28 साल से हत्या के जुर्म मे फरार आरोपी को पकडने मे बड़ी कामयाबी हासिल हुई है द्यकाशीमीरा पुलिस स्टेशन मे रखे प्रेस वार्ता में मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस उपायुक्त (क्राइम ब्रांच) अविनाश अंबुरे ने बताया कि यह हत्या का मामला 28 वर्ष पुराना है, मीरा रोड के पेणकर पाडा चाल में रहने वाले दो परिवारों का आपसी झगड़ा हो गया और बात हत्या तक पहुंच गयी द्य मामला 1994 का है, जहां पेनकर पाड़ा, काशीमीरा मे रहने वाले आरोपी ने



अपने पड़ोस के घर में जा कर पडोसी की पत्नी जागरणीदेवी प्रजापति उम्र 27 वर्ष, पुत्र कु. प्रमोद, आयु 5 वर्ष, पुत्री कु. पिकी उम्र 3 साल, सुश्री. पिंटू उम्र 2 वर्ष और 3 माह के बच्चे को गंभीर रूप से घायल कर बेरहमी से मार डाला और घर का दरवाजा बाहर से बंद कर सबूत नष्ट कर दिए ।

कई वर्ष बीत जाने के बाद भी पुलिस आरोपी की तलाश में थी, जून 2021 में क्राइम ब्रांच के पुष्पेंद्र थापा को आरोपी के बारे में सूत्रों के हवाले से खबर मिली उन्होंने आरोपियों की तलाश में उत्तर प्रदेश के कई जिलों का दौरा किया, जहां उन्हें 1 आरोपी के बारे में पता चला कि वह काम के सिलसिले में देश के बाहर गया है, क्राइम ब्रांच यूनिट ने वर्ष 2021 में लुक आउट नोटिस जारी कर दिया था, वापस भारत आने पर एयरपोर्ट के माइग्रेशन डिपार्टमेंट के मदद से पुलिस ने एक आरोपी को 28 सालों के बाद गिरफ्तार कर लिया ।

यह कार्य पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक उप आयुक्त अमोल माडंवे के मार्गदर्शन में। सीनियर पुलिस निरीक्षक अविराज कुराडे, पुलिस निरीक्षक कैलास तोकले, पुष्पराज सुर्वे, हितेंद्र विचारे, राजू सावे,संदीप शिदे, किशोर वाडिले, संजय पाटिल, संजय शिंदे, संतोष लांडगे,पुष्पेंद्र मापा, विजय गायकवाड़, प्रफुल्ल पाटिल, विकास राजपूत, समीर यादव, पाशी, प्रशांत विस्पुते, सूर्यवंशी और साथ ही उत्तर प्रदेश एसटीएफ। वाराणसी शैलेश प्रताप सिंह, पी.ओ. उप अधीक्षक, अमित श्रीवास्तव ने इस कार्य को अंजाम तक पहुंचाया ।

# शुरू होने से पहले ही वर्सोवा ब्रिज में आने लगीं दरारें

## विवादों में घिरा वर्सोवा ब्रिज, सांसद गावित अपने प्राइवेट आर्किटेक्ट को लेकर निमार्ण स्थल पर पहुंचे

■ सुरेंद्र नेगी, वसई

**भाईंदर खाड़ी** पर बन रहा वर्सोवा ब्रिज विवादों में आ गया है। ब्रिज पर डाले गए कुछ गर्डरों पर दरारें आ गई हैं। इस मामले में पालघर के सांसद राजेंद्र गावित ने आरोप लगाया है कि पुल घटिया दर्जे की सामग्री से बनाया गया है, जो खतरनाक साबित हो सकता है। गावित ने कहा कि पुल के निर्माण कार्य में बहुत लापरवाही बरती गई है। उन्होंने पुल के निर्माण स्थल पर ही अधिकारियों को कई खामियां दिखाई हैं, जिस पर अधिकारियों ने जल्द से जल्द जरूरी बदलाव करने का आश्वासन भी दिया है।

मुंबई-अहमदाबाद हाइवे के फाउंटेन स्थित वर्सोवा खाड़ी पर बन रहे फ्लाईओवर



**वर्सोवा ब्रिज में आई दरारों के बाद निरीक्षण करने पहुंचे सांसद राजेंद्र गावित।**

ब्रिज का निर्माण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण की ओर से किया जा रहा है। इस पुल का निर्माण कार्य अपने अंतिम चरण में है। यह बहुत महत्वाकांक्षी पुल है और इसके शुरू हो जाने से यातायात सुगम होगा और लोगों के समय की बचत होगी। हालांकि निर्माण कार्य पूरा होने से पहले ही यह विवादों में आ गया है। पुल पर कुछ जगहों पर जगह दरारें पड़ गई हैं। इसका निरीक्षण करने के लिए सांसद राजेंद्र गावित राष्ट्रीय महामार्ग और यातायात पुलिस को साथ ले गए। गावित के प्राइवेट आर्किटेक्ट्स ने पुल में कई खामियों और दरारों को दिखाया। साथ ही पुल के बारे में बताते हुए कहा कि पुल का निर्माण कार्य पूरा होने के बाद इसमें गर्डर डाला जा रहा है, जिस कारण पुल कमजोर होगा।

**“ निरीक्षण के दौरान हमने अधिकारियों को बताया कि पुल में दरारें पड़ गई हैं। पुल के ढांचे की रचना गलत है और पुल कमजोर है। इससे भविष्य में बड़ी दुर्घटना होने की आशंका है। इसके साथ ही पुल की उम्र लगभग 50 वर्ष ही है। यह भी एक चिंताजनक बात है।**

\- राजेंद्र गावित, सांसद पालघर

**“ जिन जगहों पर दरारें आई हैं, उनकी मरम्मत की जाएगी। लेकिन पुल के गर्डर की रचना में कोई खराबी नहीं है। फिर भी विशेषज्ञों द्वारा पुल की जांच कर उसमें उचित बदलाव किए जाएंगे।**

-मुकुंदा अत्तरडे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण परियोजना

**NBT नजरिया**

**वर्सोवा ब्रिज की गुणवत्ता पर सवाल उठना चिंता का विषय है। आखिर नए बन रहे प्रॉजेक्ट में इस तरह के सवाल कैसे? प्रशासन को इन सवालों की गहन जांच कर जनता की चिंता दूर करनी चाहिए और यदि इस मामले में कोई दोषी मिले तो उसके लिए कड़ी सजा की भी व्यवस्था करनी चाहिए। आखिर करोड़ों रुपये से बन रहे इन प्रॉजेक्ट्स से हजारों लोगों की आवाजाही होती है।**

# शीजान खान की रिमांड फिर बढ़ी

■ सुरेंद्र नेगी, वसई

ऐक्ट्रेस तुनिशा शर्मा खुदकुशी मामले में वालीव पुलिस अव तक 25 लोगों के वयान दर्ज कर चुकी है। पुलिस ने तुनिशा की मां के वयानों व आरोपों को खारिज करते हुए कहा कि जांच पड़ताल में फिलहाल कहीं भी लव जिहाद जैसा कोई भी एंगल सामने नहीं आया है। अभी मामले से संवंधित कई लोगों के वयान दर्ज होने हैं। शुक्रवार को शीजान की सेकंड रिमांड खत्म होने के वाद उसे वसई कोर्ट में पेश किया गया, जहां कोर्ट ने उसे एक दिन की रिमांड पर भेज दिया है।

**तुनिशा की मां ने लगाए गंभीर आरोप**

तुनिशा शर्मा की मौत के वाद तुनिशा की मां वनिता शर्मा ने आरोपी शीजान खान पर कई गंभीर आरोप लगाए हैं। उन्होंने तुनिशा के सुइसाइड करने का जिम्मेदार शीजान खान को वताया है। उन्होंने इसे लव जिहाद का मामला वताते हुए अपनी वेटी के लिए इंसाफ मांगा है। वनिता शर्मा ने कहा कि शीजान ने उनकी वेटी को धोखा दिया है। जव वह दूसरी लड़की से प्रेम करता था, तो उसने तुनिशा के साथ रिलेशन क्यों वनाए रखा। शीजान की वहन तुनिशा को दरगाह ले जाया करती थी। हमने शीजान को कई वार समझाने की कोशिश की, लेकिन वह नहीं माना।

**■ पुलिस ने कहा- लव जिहाद जैसा कोई एंगल नहीं मिला**

**■ तुनिशा खुदकुशी मामले में अब तक पुलिस ने किए 25 लोगों के बयान दर्ज**



**पुलिस ने लव जिहाद मामले से किया इंकार**

तुनिशा शर्मा की मां के आरोपों को पुलिस ने इनकार कर दिया है। वालीव पुलिस ने वताया कि जांच पड़ताल में कहीं भी लव जिहाद जैसा कोई एंगल सामने नहीं आया है। सेट पर दोनों (तुनिशा और शीजान) एक साथ काम करते थे। घटना के दिन दोनों के वीच कोई विवाद भी नहीं हुआ। फिलहाल मामले की जांच चल रही है।

# नायगाव पोलीस ठाणे लवकरच कार्यान्वित होणार

सुधीर भोईर
■ वसई

वसईतील चौथे व अत्यंत महत्वपूर्ण नायगाव हे पोलीस ठाणे नवीन वर्षात 26 जानेवारीला सुरू होण्याचे संकेत मिळत आहेत. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे नवीन पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी पदभार स्विकारल्यानंतर नायगाव पोलीस ठाण्याचा प्रश्न निकाली लावला आहे. त्यानुषंगाने नवीन नायगाव पोलीस ठाणे लवकरच कार्यान्वित होईल असा विश्वास आहे. या नवीन वर्षात नायगावकरांना नवीन पोलीस ठाणे मिळणार असून लवकरच ते पोलीस ठाणे नायगावकरांच्या सेवेसाठी सज्ज होईल, अशी आशा नायगावकरांना आहे.

सध्या वालीव पोलीस ठाणे हे गुन्हेगारीच्या बाबतीत आघाडीवर आहे. तसेच मोठ्या परिसरातील वाढते नागरिकीकरण लक्षात घेता एकट्या वालीव पोलीस ठाण्यावरच नायगाव पूर्व परिसराचा भार आहे. जोवर नियोजित नायगाव पोलीस ठाणे निर्माण होत नाही तोवर वालीव पोलीस ठाणेच या परिसराचा भार वाहणार आहे.

नव्या नायगाव पोलीस ठाण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून मनुष्यबळाचीदेखील नवीन पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी नेमणूक करण्याच्या सूचना केल्या आहेत. वालीव पोलीस ठाण्यातील वाढते गुन्हेगारीचे प्रमाण पाहता नायगाव पोलीस ठाण्याचा प्रस्ताव पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी तयार करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

नायगाव पूर्व परिसरात सध्या नागरिकीकरण झपाट्याने वाढत आहे. अनोळखी इसम मोठ्या संख्येने येथे वास्तव्याला येत आहेत. त्यामुळे गुन्हेगारीचा वेग वाढत चालला आहे. या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन नायगाव पोलीस ठाणे महत्वपूर्ण ठरेल, असा आशावाद व्यक्त होत आहे.

### *नियोजित नायगाव पोलीस ठाण्यात अधिकाऱ्याच्या नेमणुका*

*नियोजित नायगाव पोलीस ठाण्याच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक पदी काशिमिरा वाहतूक विभागाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक रमेश पंढरीनाथ भामे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी विशेष शाखा तथा जसंपर्क अधिकारी बलराम भास्कर पालकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सुरक्षा शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद रामभाऊ वाघ यांचीदेखील नियोजित नायगाव पोलीस ठाण्याच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सदरचे नियोजित नायगाव पोलीस ठाणे महिनाभराच्या अंतराने सुरू होण्याची शक्यता असून तोपर्यंत वालीव पोलीस ठाण्याकडूनच या या परिसराचा भार सांभाळला जाणार आहे.*